विद्या विकास मंडळ, साक्री (धुळे)
|| उद्यमेन हि सिध्यंती ||

# विद्या विकास मंडळाचे
# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री ता. साक्री जि. धुळे







CORONA
STOP
STAY HOME SAVE LIVES

## माहिती पत्रक २०२०-२१

## Prospectus 2020-21

Ph. 02568-242323
Fax 02568-242323
Email : vidyavikas2006@rediffmail.com
Website : www.sgpcsakri.com

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे

## Mission

**"To seek the ideals and dreams would not be attained without hard work in association with the hand, heart and head. We aim to achieve the above goals through our qualitative and quantitative efforts for the youth"**

## दृष्टीक्षेप

- ✓ महाविद्यालय स्थापना : १५ जून १९७१
- ✓ कॉलेज कोड नं. : २१००२६. (कॉलेज सेंटर नं. : २१०५)
- ✓ विद्याशाखा : कला, विज्ञान व वाणिज्य पदवी पर्यंतचे अभ्यासक्रम
- ✓ पदव्युत्तर संशोधन केंद्र : प्राणिशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतिशास्त्र, मानसशास्त्र
- ✓ तज्ज्ञ अनुभवी शिक्षक : ४० (पीएच.डी. २४, एम.फील. ०६, नेट/भेट १९)
- ✓ जिमखाना विभाग : सर्व स्वदेशी-विदेशी खेळांची सुविधा
- ✓ गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना, वाचन कक्ष
- ✓ राष्ट्रीय छात्र सेना : ५४ विद्यार्थी
- ✓ विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वस्तीगृह
- ✓ विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, कमवा व शिकवा योजना
- ✓ विविध मंडळाद्वारे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न
- ✓ विद्यार्थी संसद
- ✓ महाविद्यालय मान्यता : शासन/जा.क्र./नवीन/७१-७२/६३१/२०.३.१९७२
- ✓ यु.जी.सी. १२बी : युजीसी १९५६, ३१.०३.२००४
- ✓ एम.ए. समाजशास्त्र
- ✓ एकुण विभाग : १८
- ✓ शिक्षकेतर कर्मचारी : ३१
- ✓ ग्रंथालय : ग्रंथसंख्या ३८५६४, किंमत रुपये ३५,६९,४२३.९५/-
- ✓ राष्ट्रीय सेवा योजना : २५० विद्यार्थी
- ✓ चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- ✓ इंग्रजी रेमेडियल क्लास व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन
- ✓ युवती सभा
- ✓ पर्यावरण शिक्षण केंद्र

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## माहिती पत्रकः-

उच्च शिक्षणाची वाढती गरज लक्षात घेऊन मा.कै.दादासाहेब रामराव सिताराम पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली दिनांक २०/५/१९७० रोजी विद्या विकास मंडळ या शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. या संस्थेच्या विद्यमाने दिनांक १५ जुन १९७१ पासुन सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथे सुरु करण्यात आले.

आमचे महाविद्यालय क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावशी संलग्न असून सर्व वर्गांचे अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, प्रमोशन पध्दती, प्रवेश, पात्रता व आकारावयाचे शुल्क इत्यादी बाबत क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

## ॥ उद्यमेनहिं सिध्यंति ॥

विद्यार्थ्यांची विविध विषयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, वेगवेगळ्या योजना आणि उपक्रमाद्वारे त्यांना व्यक्तिमत्वाची सर्वांगीण जडण-घडण करणे. लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक असलेला आदर्श नागरिक घडविणे, विविध क्षेत्रातील ज्ञानासोबत बदलणाऱ्या परिस्थितीची त्याला ओळख करून देणे. लोकशाही हा जीवनमार्ग मानून तिची मूल्ये तरूण मनात रूजविण्याचा प्रयत्न करणे. त्याची विज्ञाननिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणे. त्याचबरोबर विज्ञान आणि भावना यांची जोड देवून सुशिक्षीत आणि सुसंस्कृत माणूस घडविणे. जेणे करून २१ व्या शतकातील परिवर्तनाशी सामोरे जाण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. विज्ञाननिष्ठ लोकशाही मूल्य जपणारा, सत्यशोधक, सुशिक्षीत, सुसंस्कृत आणि परिवर्तनाशील युवक घडविणे हेच महाविद्यालयाचे ध्येय आहे.

## महाविद्यालयाचा परिसरः

साक्री गावाला लागुनच नागपूर – सुरत राष्ट्रीय महामार्गावर महाविद्यालयाच्या वास्तूची उभारणी करण्यात आलेली आहे. या इमारतीत व्यायामशाळा, प्रशासनविभाग, महिला दालन, प्रयोगशाळा, कार्यालय, शिक्षक दालन, ग्रंथालय, वाचनकक्ष, अतिथीगृह, संगणक कक्ष, वसतिगृह, वर्गखोल्या इ.सर्व सोयी पूर्ण झालेल्या आहेत.

## ग्रंथालयः

सुसज्ज व समृध्द ग्रंथालय प्रत्येक महाविद्यालयाचा प्राण असतो. आमचे ग्रंथालय संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके यांनी समृध्द आहे. महाविद्यालयाने पुस्तक पेढी योजना सुरु केली असून त्यात गरीब विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके मिळू शकतील अशी सोय केलेली आहे. ग्रंथालयाची सुसज्ज इमारत असून स्वतंत्र वाचन कक्ष व रात्रीच्या अभ्यासिकेची व्यवस्था आहे. स्पर्धा परीक्षा तयारीसाठी चाणक्य मंडळाच्या स्वतंत्र वाचन कक्षासह पुस्तकांची व्यवस्था केली आहे.

## ग्रंथालय नियमः

१. ग्रंथालयात एका वेळस एकच ग्रंथ मिळेल, परंतु मागणी पत्रिकेत तीन ग्रंथांची नावे द्यावीत.
२. ग्रंथालयातील ग्रंथ ७ दिवसात जमा करावेत, अन्यथा दंड आकारला जाईल.
३. ग्रंथालयातील ग्रंथ काळजीपूर्वक वापरावेत. जर ग्रंथांची पाने फाडली व ग्रंथ गहाळ केले तर ग्रंथाची किंमत वसुल केली जाईल किंवा तत्सम ग्रंथ आणून द्यावा लागेल.
४. ग्रंथालय अनामत महाविद्यालय सोडल्यानंतर परत केली जाईल.

## मुलांचे वसतिगृह:

साक्रीपासून लांब गावांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज एस.टी.ने येणे शक्य होत नाही, त्यातल्या त्यात पिंपळनेर, दहिवेल व छडवेल कोर्डे पलीकडे असणाऱ्या आदिवासी गावातील विद्यार्थ्यांना साक्रीत राहण्याची सोय होवू शकत नाही. अशा विद्यार्थ्यांना आमच्या वसतीगृहात मुख्यत्वाने प्रवेश दिला जातो.

## मुलींचे वसतिगृह:

महाविद्यालयाच्या परिसरात २५ विद्यार्थीनींसाठी सुसज्ज व सर्व सोयींयुक्त वसतीगृहाची सुविधा उपलब्ध आहे. या व्यतिरीक्त विद्यार्थीनींसाठी साक्री शहरात शासकीय वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे.

## वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी नियम:

१. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे स्वतःची मच्छरदाणी असणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी महाविद्यालयाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी काटेकोर पालन केले पाहिजे.
३. रात्री ९.३० ते सकाळी ६.०० वाजे दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्याने खोलीत हजर असले पाहिजे.
४. विद्यार्थ्यांच्या पालकास किंवा पाहुण्यांना कोणत्याही कारणास्तव वसतिगृहात मुळीच राहता येणार नाही.
५. विद्यार्थ्यांनी मोठी रक्कम अगर मौल्यवान वस्तू खोलीत ठेऊ नयेत.
६. बाहेरगांवी जातांना विद्यार्थ्याने वसतीगृह प्रमुखाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
७. महाविद्यालया बाहेरील कोणत्याही संस्थेचे किंवा संघटनेचे कार्य वसतिगृहाच्या परिसरात चालू दिले जाणार नाही.
८. महाविद्यालयात किंवा वसतिगृहात कोणतेही शिस्तबाह्य वर्तन किंवा महाविद्यालयाला कमीपणा येईल असे वर्तन आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यांस वसतिगृहातून कमी करण्यात येईल.
९. वरील कोणत्याही नियमाचे किंवा वसतिगृह प्रमुखाने वेळोवेळी घालुन दिलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यास योग्य ते शासन केले जाईल.

## शारीरिक शिक्षण व खेळ:

बौध्दिक शिक्षणाला शारीरिक शिक्षण व खेळ यांची जोड असल्याखेरीज व्यक्तिमत्वाचा समतोल विकास होवू शकत नाही, यादृष्टीने जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना खेळात सामावून घेतले जाते. त्यासाठी तज्ज्ञ शिक्षकाची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध देशी व विदेशी खेळ शिकविण्याची सोय करण्यात आली आहे. आंतर विभागीय सामन्यात आमच्या संघांनी आपली चमक वेळोवेळी दाखविली आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना:

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौध्दिक विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून आमच्या महाविद्यालयात १९७८ पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक कार्यरत आहे. श्रमप्रतिष्ठा, सहजीवन, सेवाभाव, साहचर्य, व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी इत्यादी गुण विद्यार्थ्यांत विकसित व्हावेत म्हणून एकक प्रयत्न करते. क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सन २००१-०२ साली आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाचा उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. आमच्या एककात नियमित कार्यक्रमासाठी २५० तर विशेष शिबीरासाठी १२५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

## राष्ट्रीय छात्र सेना:

विद्यार्थ्यांत सैनिकी जीवनाची व शिस्तीची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आमच्या महाविद्यालयात सन १९७८ पासून राष्ट्रीय छात्र सेनेचे पथक कार्यरत आहे. 'बी' व 'सी' प्रमाणपत्र परिक्षेला बसण्याची सुविधा उपलब्ध आहे. छात्र सेनेत ५४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

## चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र:

आजचं युग हे स्पर्धेचं युग आहे, स्पर्धा परीक्षांना समर्थपणे सामोरं जाण्याची क्षमता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये यावी म्हणून आमच्या महाविद्यालयात चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. केंद्रासाठी स्वतंत्र ग्रंथालय व अनुभवी प्राध्यापक वर्ग आहे.

## प्राध्यापक वर्ग:

महाविद्यालयासाठी आपल्या विषयात तज्ज्ञ, अनुभवी, कार्यक्षम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांबद्दल सहानुभूती असणाऱ्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आमचा प्राध्यापक वर्ग सदैव प्रयत्नशिल असतो. आमच्या प्राध्यापकांनी एम.फिल, पीएच.डी. सारख्या शिक्षण क्षेत्रातील उच्च पदव्या संपादन केलेल्या आहेत. यु.जी.सी.ने मंजुर केलेले अनेक संशोधन प्रकल्प प्राध्यापकांनी पूर्ण केले आहेत.

## सांस्कृतिक व मूल्यशिक्षण:

अभ्यासक्रमा व्यतिरीक्त विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास व्हावा व त्यांच्या व्यक्तिमत्वाची सर्वांगीण वाढ व्हावी या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रम आखले जातात. वादविवाद मंडळ, कलामंडळ, वाङःमय मंडळ, शैक्षणिक सहली इ. कार्यक्रम योजिले जातात. एकलव्य प्रशिक्षण केंद्रामार्फत आदिवासी विद्यार्थी विकास योजना राबविल्या जातात व त्याद्वारे मूल्यशिक्षण दिले जाते.

## बक्षिसे, शिष्यवृत्या व आर्थिक सवलती:

परीक्षेत चांगले यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाविद्यालयाकडून बक्षिसे व शिष्यवृत्या देण्यात येतात.

१. १२ वीच्या आणि विद्यापीठ परीक्षेत शेकडा ६०% पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमधुन गुणवत्तेच्या क्रमानुसार शिष्यवृत्या दिल्या जातात.
२. वार्षिक परीक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.
३. मागासवर्गातील विद्यार्थी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा कमी आहे त्यांना व सैनिकांच्या मुलामुलींची फी सरकारकडून मिळत असते.
४. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विद्यार्थी निधीतून योग्य ती मदत दिली जाते. कमवा व शिका योजनेंतर्गत श्रमाच्या मोबदल्यात योग्य ते आर्थिक सहाय्य देण्यात येते.
५. महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या सवलती व शिष्यवृत्या या संबंधीची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते व त्यासाठी छापील नमुन्यात अर्ज मागविले जातात.
६. आदिवासी विद्यार्थ्यांकडून एकलव्य विद्याधन योजनेसाठी अर्ज मागविले जातात.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ :

## महाविद्यालय प्रवेश घेण्यासंबंधी माहिती:-

महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी माहितीपत्रक विकत घेवून संबंधीत वर्गाचा प्रवेश अर्ज करावा. प्रत्येक विषयासाठी चाचणी परीक्षा प्रत्येक सत्रात घेतली जाईल. तसेच ८० टक्के हजेरी सक्तीची राहील. याबाबत क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून जे जे बदल करण्यात येतील त्याची लगेच अंमलबजावणी करण्यात येईल. वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक वर्गासाठी अगर कोर्ससाठी प्रवेश देतांना तुकड्या व संख्या यांचे बंधन आहे. क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अध्यादेशानुसार सर्व विद्याशाखांसाठी हे बंधन पाळले जाईल. आपल्या महाविद्यालयातील जागा मर्यादित असून त्यात प्रवेश आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासन व क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नियम तंतोतंत पाळले जातील.

## प्रवेश प्रक्रिया:

महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांसाठीच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी व एम.ए. समाजशास्त्रसाठी प्रवेश प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी ठरविलेल्या नियमानुसार राहील. प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीः

१. १२ वी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आत प्रवेशाचे अर्ज मागणी करून तेथून पाच दिवसात गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येईल व तद्नंतर पाच दिवसात गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातील. ३० जुलै नंतर कोणासही प्रवेश दिला जाणार नाही. प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास ५० टक्के फी परत मिळेल.

२. प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

- १० वी, १२ वी मूळगुणपत्रक व प्रत्येकी दोन छायांकीत प्रती.
- शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत व दोन छायांकीत प्रती.
- जातीचा, उत्पन्नाचा दाखला, एक छायांकीत प्रत.
- एक पासपोर्ट व दोन स्टॅम्प साईज फोटो.
- गॅप असल्यास गॅप सर्टिफिकेट.

**टिप**: मूळ शाळा सोडल्याच्या दाखल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही.
(डुप्लीकेट एलसी/टीसीवर प्रवेश मिळणार नाही)

## कला विद्याशाखा:

*** प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)**

गट अ : सक्तीचे इंग्रजी
गट ब : मराठी/हिंदी/वैकल्पिक इंग्रजी (यापैकी कोणतीही एक भाषा)
गट क : समाजशास्त्र
गट ड : भूगोल
गट इ : अर्थशास्त्र/मानसशास्त्र
गट ई : इतिहास
गट उ : राज्यशास्त्

**सूचना** : १) गट अ व ब सक्तीचा आहे.
२) उरलेल्या गटातून कोणतेही चार विषय निवडता येतील.

**टिप**: प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या वर्गासाठी पर्यावरण अभ्यास हा विषय अनिवार्य आहे.इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र हे विषय विशेषस्तरावर शिकविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक गट निवडावा.

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून आपल्या विद्यापीठाने CBCS प्रणाली लागू केलेली आहे. शै.वर्ष २०२०-२१ पासून ती प्रणली तृतीय वर्षात लागू राहील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. याविषयी काही अडचणी शंका असल्यास महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया समितीशी संपर्क साधावा.**

**Semester structure of F.Y.B.A. (Faculty of Humanities) under CBCS Patter**

| Semester | Discipline Specific Core Course (DSC) Compulsory courses | Ability enhancement |
|---|---|---|
| Sem I | Comp.English<br>MILComp. (Marathi/Hindi)<br>DSC A-1<br>DSC B-1<br>DSC C-1<br>DSC C-1 | |
| Sem II | Comp.English<br>MILComp. (Marathi/Hindi)<br>DSC A-2<br>DSC B-2<br>DSC C-2<br>DSC C-2 | Environment Students |

**<u>द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)</u>** (एकुण सहा विषय)

१. सक्तीचे विषय – अनिवार्य इंग्रजी

२. विशेष विषय: प्रथम वर्षात घेतलेल्या गटापैकी (एस १, एस २)

३. प्रथम वर्षातील घेतलेल्या विषयांपैकी तीन विषय (जी २)

४. प्रथम वर्षास मानसशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्र (जी २) हा विषय सक्तीचा राहील.

**टिप**: विशेष विषयास विद्यार्थी संख्येची मर्यादा आहे.

**Structure of S.Y.B.A. Faculty of Humanities Under CBCS Patter**

| Sem | Discipline Specific Core course ESC | Skill Enhancement course SEC | Discipline specific elective course ESE |
|---|---|---|---|
| Sem.III | Comp.English<br>MIl-1<br>DSC 1-C<br>DSC 2-C | SEC-1 | DSE 1A<br>DSE 2A |
| Sem.VI | Comp.English<br>MIl-2<br>DSC 2-C<br>DSC 2-C | SEC-2 | DSE 1B<br>DSE 2B |

**<u>तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.)</u>** (एकुण सहा विषय)

१. सक्तीचे विषय – अनिवार्य इंग्रजी

२. द्वितीय वर्ष कला या वर्गात घेतलेल्या तीन विषयाचे तीन पेपर्स हे (जी-२), (जी-३) असतील

३. द्वितीय वर्ष कला या वर्गात घेतलेल्या विशेष विषयाचे दोन पेपर्स (एस १, एस २) हे (एस ३, एस ४) असतील.

**टिप** – विद्यार्थांना काही अडचन आल्यास संबंधीत विभागप्रमुखांशी संपर्क साधावा.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## वाणिज्य विद्याशाखा :

### प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com)

Faculty of Commerce and Management

Structure of F.Y.B.Com Programme

| Sr.No. | Course Opted | Paper No. | F.Y.B.Com. Sem.I |
|---|---|---|---|
| 1 | Core Elective | 101 | English for Business |
| | AEC – I | 102 | English/Marathi/Hindi |
| 2 | CC – I | 103 | Micro Economics |
| | CC – II | 104 | Financial Accounting & Costing |
| | CC – III | 105 | Computing skill |
| | CC – IV | 106 | Modern Office Management |
| 3 | CC – V | 107 | Elective (any one)<br>1. Marketing and advertising<br>2. Geography of Disaster Management |

| Sr.No. | Course Opted | Paper No. | F.Y.B.Com. Sem.II |
|---|---|---|---|
| 1 | Core Elective | 201 | English for Business |
| | AEC – I | 202 | English/Marathi/Hindi |
| 2 | CC – I | 203 | Micro Economics |
| | CC – II | 204 | Financial Accounting & Costing |
| | CC – III | 205 | Computing skill/Quantative Technique |
| | CC – IV | 206 | Modern Office Management |
| 3 | CC – V | 207 | Elective (any one)<br>1. Marketing and advertising<br>2. Geography of Disaster Management |

### द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com)

Faculty of Commerce and Management

Structure of S.Y.B.Com programme

| Sr.No. | Course Opted | Paper No. | S.Y.B.Com. Sem.III |
|---|---|---|---|
| 1 | CC-I | 301 | Business Skills |
| | CC-II | 302 | Micro Economics |
| | CC-IV | 303 | Business & Tax Laws |
| | CC-V | 304 | Corporate Accounting |
| | | 305 | Computing Management |
| | | 306 | Business Entreprenurship |
| 2 | SEC-I | 307 | Retail Management |

| Sr.No. | Course Opted | Paper No. | S.Y.B.Com. Sem.IV |
|---|---|---|---|
| 3 | CC-I | 401 | Business Skills |
| | CC-II | 402 | Micro Economics |
| | CC-IV | 403 | Business & Tax Laws |
| | CC-V | 404 | Corporate Accounting |
| | | 405 | Computing Management/ Busi.Communication |
| | | 406 | Business Entreprenurship |
| 4 | SEC-I | 407 | Retail Management |

### तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com)

1. Indian Economic Scenario 2. Principles & Practices of Auditing
3. Income Tax & Soft Skill Development 4. Human Resource Management
5. Elective (any one):
a) Modern Management Techniques b) Investment Management
6. Advanced Accounting – I 6. Advanced Accounting – II

**टिप** – विद्यार्थांना काही अडचन आल्यास संबंधीत विभागप्रमुखांशी संपर्क साधावा.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## विज्ञान विद्याशाखा:

**प्रथम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.)**

प्रथम वर्ष विज्ञान वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांला खालीलपैकी कोणत्याही एका गटातील चार विषय घेता येतील.

गट अ) १. गणित २. रसायनशास्त्र ३. भौतिकशास्त्र ४. प्राणीशास्त्र

गट ब) १. भौतिकशास्त्र २. रसायनशास्त्र ३. वनस्पतीशास्त्र ४. प्राणीशास्त्र

**Faculty of Science & Technology**
**Structure of F.Y.B.Sc. programme**

| Semister | Core Course | | Ability enhancement compulsory course |
|---|---|---|---|
| Sem.I | DSC 1A | Paper I<br>Paper II<br>Practical | English/Hindi/MIL communication or Environmental studies |
| | DSC 2A | Paper I<br>Paper II<br>Practical | |
| | DSC 3A | Paper I<br>Paper II<br>Practical | |
| Sem.II | DSC 1B | Paper I<br>Paper II<br>Practical | English/Hindi/MIL communication or Environmental studies |
| | DSC 2B | Paper I<br>Paper II<br>Practical | |
| | DSC 3B | Paper I<br>Paper II<br>Practical | |
| | DSC 4B | Paper I<br>Paper II<br>Practical | |

- Students will choose four core courses
- Ability Enhancement Compulsory courses English/Marathi/MIL can be chosen at Sem I or Sem II

**द्वितीय वर्ष विज्ञान (S.Y.B.Sc)**

एफ.वाय.बी.एस्सी. वर्गात घेतलेल्या चार विषयांपैकी अ) गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र ब) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, क) रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र या गटातील एक गट आवश्यक राहील. याशिवाय इंग्रजी किंवा मराठी यापैकी एक विषय आवश्यक असेल.

**Faculty of Science & Technology**
**Structure of S.Y.B.Sc. programme**

| Semister | Core Course | | Ability enhancement compulsory course | Skill enhancement course | Discipline specific elective |
|---|---|---|---|---|---|
| Three III (Total credits =22) | DSC-1C (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | English/ Marahti/ Hindi/ MIL communication III (Advance) (Credit 2) | SEC – I (Credit 2) | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | | | |
| | DSC-2C (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | | | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | General Knowledge paper (Non credit) | | |
| | DSC-3C (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | | | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | | | |

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

| Semister | Core Course | | Ability enhancement compulsory course | Skill enhancement course | Discipline specific elective |
|---|---|---|---|---|---|
| Three IV (Total credits =22) | DSC-1D (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | English/ Marahti/ Hindi/ MIL communication IV (Advance) (Credit 2) | SEC – II (Credit 2) | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | | | |
| | DSC-2D (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | | | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | General Knowledge paper (Non credit) | | |
| | DSC-3D (Credit 6) | Paper 1 (Credit 2) | | | |
| | | Paper 2 (Credit 2) | | | |
| | | Practical (Credit 2) | | | |

- Students will choose ३ core courses out of ४ offered at first year.
- Students have to choose skill enhancement course (SEC) carefully to choose their specialization at third year.
- For Fresh candidates assessment of non-credit course (General Knowledge) will be at the end of fourth semester.
- One hour per week should be given to (Test & Tutorial) Internal Evaluation for each subject.

**तृतीय वर्ष विज्ञान (T.Y.B.Sc)**

एस.वाय.बी.एस्सी वर्गात घेतलेल्या तीन विषयापैकी कोणताही एक विषय विशेष म्हणून घेता येईल.

महाविद्यालयात खालील विषय विशेषस्तरावर शिकविले जातात.

१. रसायनशास्त्र २.भौतिकशास्त्र ३.वनस्पतीशास्त्र ४.प्राणीशास्त्र.

**टिप** – विद्यार्थांना काही अडचन आल्यास संबंधीत विभागप्रमुखांशी संपर्क साधावा.

**विशेष सूचना:**

'पर्यावरणशास्त्र' हा अभ्यासक्रम प्रथम वर्ष कला/विज्ञान/वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यासाठी सक्तीचा असेल. 'सामान्य ज्ञान' हा विषय प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा असेल. द्वितीय वर्षाच्या शेवटी या अभ्यासक्रमाची परीक्षा होईल. त्यासाठी विद्यापीठ नियमाप्रमाणे वेगळी फी आकारली जाईल.

**परीक्षा:**

१) क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यापीठ (U.A.) व महाविद्यालय अंतर्गत (C.A.) परीक्षा होतील.

२) अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांने वर्गात सातत्याने हजर राहून संबंधीत विषय शिक्षकांशी संपर्कात राहणे आवश्यक आहे. शिक्षकांनी दिलेले स्वाध्याय, घटक चाचणी, महाविद्यालयाच्या विविध उपक्रमातील सहभाग, वर्गातील उपस्थिती इत्यादी बाबींचा विचार करुन गुण दिले जातील.

**एम.ए.समाजशास्त्र (संयुक्त) :**

एम.ए.समाजशास्त्र (संयुक्त) या अभ्यासक्रमासाठी क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संलग्नीकरण मिळालेले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासन विद्यापीठ निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल. सदर अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे. प्रत्येक वर्षासाठी एकूण ४ पेपर विद्यापीठाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे शिकविले जातील.

## फी:

१) विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेस बसतांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे परीक्षा फी भरावी लागेल. फी चलन / पावती विद्यार्थ्यांनी सांभाळली पाहिजे. प्रवेश अर्ज, पात्रता अर्ज व परीक्षा फार्मवर विषय स्वतः लिहावे. एकदा घेतलेले विषय बदलता येणार नाहीत. परीक्षा फार्ममध्ये भरलेल्या माहितीस संबंधीत विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

२) पेईंग विद्यार्थ्यास महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विद्यापीठ नियमानुसार संपूर्ण फी भरावी लागेल.

३) एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर केव्हाही महाविद्यालय सोडले तर पूर्ण सत्राची फी वसुली केली जाईल. एकदा भरलेली फी कोणत्याही अटीवर परत मिळणार नाही.

४) महाविद्यालयात प्रवेश घेतांना भरलेली अनामत रक्कम कॉलेज सोडल्यावर वर्षअखेर परत करण्यात येईल. कॉलेज सोडल्यानंतर फक्त वर्षाच्या आतच डिपॉझीट रिफंडकरीता आलेल्या अर्जाचा विचार केला जाईल. वरील अनामत रक्कम परत मिळण्यासाठी करावयाचा अर्जासोबत रिसीट, ओळख पत्र (Identity Card) व लायब्ररी कार्ड वाचनालयात परत करणे आवश्यक आहे. त्या शिवाय अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

५) महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शिक्षण शुल्कासंबंधी काही सुधारणा केल्यास त्या प्रत्येक प्रवेशीत विद्यार्थ्यास बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी. त्यासंबंधी प्रत्येक विद्यार्थ्याने हमीपत्र देणे आवश्यक आहे. (फी संबंधीचा तक्ता पुढील पानावर दिलेला आहे.)

## मागास जाती जमाती, भटक्या आणि विमुक्त जाती व इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत :-

१. मागास जाती जमातीच्या व इतर मागस वर्गातील विवद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शासनाने निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल आणि शासनाच्या नियमाप्रमाणे तो शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असेल तर अशा विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी करावयाचा छापील अर्ज कार्यालयातून [off Line] विनामुल्य मिळतील / **ऑन लाईन विद्यार्थ्यांनी सायबर कॅफे** येथून भरुन कार्यालयात जमा करावे त्यात फ्रेश व रिन्युअल असे दोन मुख्य प्रकार असतात.

२. तसेच ज्या मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शासनाने निर्धारीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असेल किंवा ज्यांच्या पालकांचे उत्पन्न कमी असून देखील जे विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत नापास झाले असतील त्यांनी [Incom & Caste Certificate] चा फार्म भरावयाचा आहे. त्यास मंजुरी मिळाल्यास फी सवलत मिळू शकेल.

३. शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या मागास जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी या वेबसाईट वरती फार्म भरावा. [शासकीय वसतिगृहात राहून वसतिगृहाची माहिती न भरल्यास त्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मिळणार नाही याची नोंद घ्यावी]

४. मागास जाती जमाती व इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. त्यात येणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना प्राध्यान्य दिले जाईल. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जावर तसा उल्लेख करावा. तसा स्वतंत्र दाखला कार्यालयातून त्यांना मिळेल.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## ADMISSION FEE CHART 2020-21

| Sr. No. | Fee | FYBA | SYBA | TYBA | FYBCom | SYBCom | TYBCom | FYBsc | SYBsc | TYBsc | M.A.I | M.A.II |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tution Fee | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 5000 | 5000 |
| 2 | Admission Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 3 | Library Fee | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 250 | 250 |
| 4 | Laboratory Fee (Science) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 600 | 700 | 800 | 0 | 0 |
| 5 | Geo-Lab-Fee | 0 | 150 | 150 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | Student Activities Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 50 | 50 |
| 7 | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 8 | Magazine Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 9 | Gathering Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 10 | Medical Fee | 25 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 25 | 0 |
| 11 | Eligibility Fee | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 | 50 | 0 |
| 12 | MKCL Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 13 | Tutorial & Internal Exam. Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 14 | College Development Fund | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 90 | 90 |
| 15 | Computerization Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 16 | Alumni Association Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | Poor Student Aid Fund | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 60 | 60 |
| 18 | Student Group Insurance | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 19 | Library Deposit | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 150 | 0 |
| 20 | Laboratory Deposit | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | Identity Card | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 22 | Registration Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 75 | 75 |
| 23 | Personality Development &Career Guidance Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 24 | Ashwemedh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 25 | Disaster Management Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 26 | Miscellaneous Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 150 | 150 |
| 27 | Computer Lab. Fee | 0 | 0 | 0 | 350 | 400 | 450 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 28 | Envirenment Sci. Fee | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 0 | 0 |
| 29 | G.K. Fee | | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 | 0 |
| 30 | Self Finance Unit | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 31 | Office Autometion Process Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| | | 2030 | 1955 | 1905 | 2380 | 2205 | 2205 | 2780 | 2505 | 2555 | 6475 | 6250 |

टिपः- विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश शुल्कात बदल झाल्यास प्रवेश शुल्क देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

**शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना सूचना: [महाडिबीटी वेबसाईट वरती अर्ज भरावा]**

विहीत नमुन्यातील शिष्यवृत्ती अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

| **प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष कला/विज्ञान /वाणिज्य, एम.ए.भाग-१ व२ साठी** |
|---|
| १.आधार कार्ड व मोबाईल नंबर स्वतःचा असावा [शिष्यवृत्ती अर्ज भरणारे सायब्रर कॅफे यांचा मोबाईल नंबर नको] [**आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असावे**] |
| २.शाळा सोडल्याचा दाखला-एस.एस.सी.चे एल.सी व गुणपत्रक झेरॉक्स प्रत |
| ३.शाळा सोडल्याचा दाखला-एच.एस.सी.चे एल.सी व गुणपत्रक झेरॉक्स प्रत |
| ४.मागील ३ वर्षाचे गुणपत्रक [पास-नापास सर्व] |
| ५.खंड असल्यास खंड प्रमाणपत्र [प्रवेश घेतांना व शिष्यवृत्ती अर्ज भरतांना लागेल.] |
| ६.प्रवेश पावती-दिनांकासहीत [मुळ प्रवेश पावती स्कॅन साठी] |
| ७.आदेश क्रमांक व जिल्हा बदल प्रमाणपत्र |
| ८.मुळ उत्पन्नाचा दाखला |
| ९.जातीचा दाखला |
| १०.जातप्रमाणपत्र नॉनक्रिमिलियर [NT/SBC/OBC] साठी |
| ११.डोमेसाईल प्रमाणपत्र |
| १२.प्रतिज्ञा पत्र [कुंटूंब प्रमाणपत्र] |
| १३.शासकीय **वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहाचा दाखला-म.गृहपाल व मा.प्राचार्य सो., यांची स्वाक्षरी असणे अत्यावश्यक आहे.** [**वसतिगृह दाखल्यावर दिनांक असणे आवश्यक आहे.**] |
| १४.इतर अत्यावश्यक कागदपत्रक |

**सर्व कागदपत्रक शिष्यवृत्ती अर्जास लावून कार्यालयात जमा करावे व पोच घ्यावी.**

१. मागील ३ वर्षाचे गुणपत्रक    २. शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्य प्रत.

३. जातीचे प्रमाणपत्र [सक्षम अधिकाऱ्याने दिलेले: खाडाखोड नसावी]

४. उत्पन्नाचा दाखला [तहसिलदार किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेला]

वडीलांच्या उत्पन्नाचा दाखला [रेशन कार्ड आजी आजोबांच्या नावाने असले तरी चालेल.]

वडील हयात नसल्यास आईच्या उत्पन्नाचा दाखला व वडीलांचा मृत्यू दाखला तरी चालेल.

आई वडील हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला व आई वडीलांचा मृत्यू दाखला.

मुलगी विवाहित असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला.

आई वडील विभक्त राहत असल्यास न्यायालयाच्या निकालाची प्रत विद्यार्थ्यांचे वडील सरकारी अथवा निमसरकारी नोकरीत असतील तर त्यांच्या एकूण वार्षिक उत्पन्नाचा दाखला [पगार,महागाई भत्ता,घरभाडे इत्यादी सहीत] संबंधीत अधिकृत अधिकाऱ्यांच्या सही शिक्यानिशी जोडावा.

५. एनटी/एसबीसी/ओबीसी साठी नॉन क्रिमिलियर

६. शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसिलदार यांच्या समोरील प्रतिज्ञापत्र

७. फ्रीशीपसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र

८. महाविद्यालय बदल असल्यास मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा मान्यता क्रमांक व रक्कम

९. वडीलांची बदली झाल्यामुळे विद्यार्थी बाहेरच्या जिल्हयातून आला असेल तर जिल्हा बदल प्रमाणपत्र

१०.आधार कार्ड झेरॉक्स प्रत व बँक पासबुक झेरॉक्स [अत्यावश्यक]

## नियम व अटी

१. शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असली पाहिजे.

२. एका विद्यार्थ्यांस एकच अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती लागू राहील [उदा.११ वी, १२ वी कला, बी.ए., एम.ए.,एम.फिल, पीएच.डी.] परंतु एखाद्या विद्यार्थ्यांने बी.ए.नंतर बी.एड्. हा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि नंतर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर एम.ए.कोर्ससाठी त्यास शिष्यवृत्ती मंजुर होणार नाही. परंतु बी.एड.नंतर एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यास तो प्रोफेशनल पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास शिष्यवृत्ती मंजुर करता येईल. एका विद्यार्थ्यास २ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

३. शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेली आहे. तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला पाहिजे जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर दुसऱ्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती त्यास मंजूर होणार नाही. विद्याशाखा बदल करणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. [उदा.बी.एड्. अथवा एल.एल.बी. पूर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळणार नाही.]

५. पुनःप्रवेशित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

६. महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थी जर महाविद्यालयात शिकत असतील तर त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे ही शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

७. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मुदतीत भरण्याची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.

८. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांला स्टेट बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/युनियन बँक/देना बँक इ. [राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे.]

९. बँकेचा खाते क्रमांक [अकौंट नंबर] विद्यार्थ्यांने अचूक द्यावा, चुकीचा खाते क्रमांक असल्यास शिष्यवृत्ती जमा न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

१०.ईबीसी-राजर्षि छत्रपती शाहू महाराज/एसटीसी/पीटीसी व शिष्यवृत्ती अर्ज न भरल्यास संपूर्ण फी भरावी लागेल.

## इतर स्कॉलरशिप व फी सवलती बाबत:

वर निर्देश केलेल्या स्कॉलरशिप, फ्रीशीप व फी सवलती व्यतिरिक्त खालील प्रकारच्या फी सवलती व स्कॉलरशिप त्यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळू शकतील.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींसाठी विशिष्ट प्रकारचे अर्ज भरावयाचे असतात अशा अर्जाचा नमुना कार्यालयात मिळू शकेल.

२. अपंग विद्यार्थ्यांना महाशय सिव्हील सर्जन, यांच्या वैद्यकीय दाखल्याच्या आधारावर अपंग विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप मिळू शकेल अशा विद्यार्थ्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा.

३. राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती ओपन मेरीट स्कॉलरशिप, प्राथमिक शिक्षकांच्या मुलामुलींसाठी स्कॉलरशिप, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप, गुणवत्ता शोध स्कॉलरशिप, विज्ञान शाखेतील हुशार विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप इ. साठी पात्र विद्यार्थ्यांनी कार्यालयात चौकशी करावी.

# सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री

## विशेष सूचना:

१. शासनामार्फत मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्यांचा लाभ घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी चुकीची व खोटी माहिती पुरविल्यास त्यास वैयक्तिकरित्या जबाबदार समजले जाईल व त्याबाबत कायदेशिर कारवाई केली जाईल.

२. वरील सर्व बाबींच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लावल्या जातील. सदर सूचना पाहून मुदतीच्या आत अर्ज करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल. मुदत बाह्य आलेल्या अर्जाचा विचार होणार नाही.

३. एकदा पात्रता झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विषय बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही.

४. प्रथम वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले १२वी चे मूळ गुणपत्रक १ ते १५ जानेवारी या कालावधीत कार्यालयातून घेऊन जावे. १ वर्षानंतर मूळगुणपत्रकाची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

५. शिक्षण बंद केल्यास किंवा पूर्ण झाल्यानंतर एकावर्षांच्या आत विद्यार्थ्यांने महाविद्यालयातून टी.सी. घेऊन जावे.

**सत्र [Term] मंजुरीसाठी महत्वाच्या अटी :** केवळ महाविद्यालयात नाव दाखल केले व फी भरली म्हणजे सत्र मंजूर होत नाही. सत्र मंजूर होण्यासाठी पुढील गोष्टीचा विचार केला जातो.

अ. विद्यार्थ्यांची सर्व दिवस सर्व तासांना उपस्थिती आवश्यक आहे.

ब. प्रत्येक विषयाचे स्वाध्याय [टयुटोरियल] वेळच्यावेळी लिहून पूर्ण करणे व त्याची फी वेळेवर देणे.

क. सर्व अंतर्गत परीक्षांना बसून समाधानकारक प्रगती दाखविणे.

ड. महाविद्यालयात, वर्गात व वर्गाव्यतिरिक्त होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेणे.

इ. वर्गात व इतर कार्यक्रमाच्या वेळी त्याचे वर्तन सभ्य व शिस्तीचे असावे.

ई. एन.सी.सी. परेडस्, राष्ट्रीय सेवा योजना शिबीर यांना नियमित हजर रहाणे. वरील नियमांच्या विरुध्द विद्यार्थ्यांचे वर्तन झाल्यास त्यास योग्य ती शिक्षा होईल. शिवाय त्याचे सत्र [Term] मंजूर केले जाणार नाही व परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

## विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम:

१. प्रत्येक विद्यार्थ्यांने सर्व विषयाच्या तासिकांना वक्तशिरपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२. महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांत प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखविणे आवश्यक आहे.

३. ८०% पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या व सहामाही आणि पूर्व परीक्षेस न बसणाऱ्या विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेस बसू दिले जाणार नाही. व त्यास फी संबंधी कोणत्याही सवलती दिल्या जाणार नाहीत.

४. प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात महाविद्यालयात येणे बंधनकारक आहे.
[विद्यार्थ्यांसाठी ब्लॅक पॅन्ट-व्हाईट शर्ट, विद्यार्थीनींसाठी ब्लॅक सलवार किंवा पॅन्ट व व्हाईट टॉप कुर्ता]

५. महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्यांस ओळख पत्र दिले जाते, त्यावर आपला फोटो चिकटवून विद्यार्थ्यांने प्राचार्यांची सही घ्यावी. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांने ओळख पत्र गळयात बाळगावे आणि ओळखपत्रावर रक्त गट नोंदविणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांने आपल्या स्वतःच्या तासिकांखेरीज अन्य वर्गाच्या किंवा इतर विषयांच्या तासिकांना बसू नये.

७. कोणत्याही प्राध्यापकांशी बोलतांना, वागतांना विद्यार्थ्यांने मर्यादेचे पालन करावे.
८. महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना वाचल्या पाहिजेत. त्यासाठी रोज सूचना फलक पाहण्याची सवय ठेवावी. संबंधीत सूचना पाहिली नाही अशी सबब केव्हाही चालणार नाही.
९. शिकविणे चालू असलेल्या वर्गात आपल्या वागण्याने कोणत्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही याची खबरदारी व्यक्तीशः घेतली पाहिजे.
१०. विद्यार्थ्यांचा पोषाख शिष्टमान्य व निटनेटका असावा.
११. महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या बाहेर विद्यार्थ्यांचे वर्तन सभ्यतेचे असावे.
१२. महाविद्यालयाची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याविषयी व आवारात स्वच्छता राखण्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांने जागरुक असावे. आवारात गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.
१३. महाविद्यालय परिसरातील वृक्ष-वेलींशी मित्रत्वाने वागावे. त्यांना इजा पोहचेल असे वर्तन करु नये.
१४. एखाद्या विद्यार्थ्याचे वर्तन महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे असे प्राचार्यांचे मत झाल्यास त्या विद्यार्थ्यांस कोणतेही कारण न सांगता महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.
१५. क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार कोणत्याही कारणास्तव महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या परिक्षेच्या वेळा पत्रकात बदल मागता येणार नाही. योग्य कारणासाठी विद्यापीठ असे बदल करु शकेल.
१६. परिक्षेच्या वेळी गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुध्द कठोर कारवाई केली जाईल.

## महत्वाच्या सूचना:

१. महाराष्ट्र शासनाच्या कायद्याप्रमाणे महाविद्यालय अगर क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठतर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन केले जाईल.
२. महाविद्यालयात गैरवर्तणूक करणाऱ्या विद्यार्थ्यांला वर्गामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.
३. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी धुम्रपान, गुटखा सेवन करणे बेकायदेशीर आहे.
४. रॅगिंग सारखा गैरप्रकार करणे कायद्याने गुन्हा आहे.
५. मुळ कागदपत्रे कार्यालयात प्रवेश घेतेवेळी जमा करतांना त्यांच्या जादा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात. त्याची कोणतीही प्रत विशिष्ट मुदतीनंतर परत मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.
६. माहितीच्या अधिकारानुसार महाविद्यालयाच्या सक्षम अधिकाऱ्याकडून माहिती मिळेल.
७. माहितीपत्रक वर्षभर जपून ठेवावे.

## रॅगिंग:

रॅगिंग म्हणजे विद्यार्थ्यांकडून इतर विद्यार्थ्यांची हेतू पुरस्कर खोड काढणे, दांडगाईने थट्टा मस्करी करणे, अवांछनीय, क्षुद्र, अश्लाघ्य वर्तणूक करणे, टिंगल उडविण्याच्या दृष्टीने चिडविणे, शारीरिक-मानसिक पिळवणूक करणे की ज्यामुळे रॅगिंगचे लक्ष्य बनविलेल्या विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव निर्माण होऊन त्यांचे मानसिक स्वास्थ बिघडणे. रॅगिंग हा कायद्याने दाखलपात्र गुन्हा आहे. [Supreme Court Judgment & Order-dated ११.२.२००९ UGC Regulation Reference:F१-१६/२००७CPP-II], dated April-२००९] दोषी विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई केली जाईल याची विद्यार्थ्यांनी गंभीर दखल घ्यावी. दोषी आढळल्यास त्याचे नाव महाविद्यालयातून, वसतिगृहातून कमी केले जाऊ शकते. तसेच दोषी विद्यार्थ्यांना कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. रॅगिंग संबंधी तक्रार असल्यास महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व कार्यालयीन अधिक्षक यांचेशी संपर्क साधावा.

## Online Admission Link:-

- **For F.Y. and M.A. Ist** :- https://enrolonline.mastersofterp.in/CollegeHome/Index/SGPSCC
- **For S.Y., T.Y. and M.A. IInd** :- https://cimsstudent.mastersofterp.in/
- **Online Fees Payment Link :-** https:// www.feepayr.com

# विद्यार्थ्यांसाठी विविध योजना



## Student Financial Scheme (Individual)

1. Hon'bal Vice Chancellor Research Motivation Scheme
2. Karmaveer Bhaurao Patil Earn and Learn Scheme
3. Students Adoption Scheme for University Education School and Department
4. Hon'bal Vice Chancellor Research Medical Fund
5. Eklavya Vidyadhan Scheme (Education Loan)
6. Poor Students Aid Fund
7. Student Safety Insurance Scheme
8. Dr. Babasaheb Ambedkar Help Scheme for University Hostel Students

## Regular Activities

1. University Level Inter College Youth Festival Yuvarang
2. Inter College Magazine Competition
3. Poem Reading Competition
4. University Trophy  Ekanankika Competition Play
5. Inter Colleges Court Competition
6. Drama Presentation Competition
7. Research Presentation Competition
8. Story Telling Competition

## Competition are Arranged in the Donors Fund

1. Late G. V. Abhyankar Marathi Natyageet and Late Shantabai G. Abhyankar Marathi Bhaavgeet Competition
2. Late Bhaisaheb Y. S. Mahajan Elocution Competition for female Students
3. Late Bhaskar Sabanis Inter Collegiate Commerce's Quize and Presentation Competition

## Special Programme for Girls Students

1. Yuvati Sabha Workshop
2. Self Defence (Swayamsidha) Abhiyan
3. Personality Development Cell

## University Level Workshop Seminar Training

1. Disaster Management Training Workshop
2. Student Personality Development Workshop
3. Stress Free Exam Campaign and Workshop
4. Culture Development Workshop
5. University Representative Leadership Development Workshop
6. District Wise Friendship Workshop
7. Natya Abhivachan Workshop
8. Speech Skill Development Workshop
9. Powada Singing Skill Workshop
10. Youth Parliament (Yuva Sansad) Workshop
11. Research Methodology Workshop
12. Anchoring Skill Development Workshop
13. Street Play Skill Development Workshop
14. ST Students Motivational Workshop
15. Sharm-Sanskar Skill Development Workshop

## Student Leadership Activity

1. College Level Student Council
2. University Schools and Department Student Council
3. University Student Council

## For the College Level Activities

1. Globalisation Rising Workshop or Similar
2. Employment Skill Development Guidance Workshop
3. Personality Development Cell
4. Stress Management and Guidance Cell

## University Level Honors Schemes

1. Youth Researcher
2. School Boys Scientist
3. College Principal and Student Welfare Officer

## Seminar for the Principal/Director/HOD Student Welfare Officers and Teachers

1. Half Yearly Meeting
2. Planning Meetings for Student Activities

**कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

संपर्क :- विद्यार्थी कल्याण विभाग, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव ०२५७-२२५७४१८, ४१९

अधिक माहितीसाठी संपर्क :- आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी

Student Helpline :-
0257-2258418
Email ID :-
sfc@nmuj.digitaluniversity.ac








द्वारा;-

**प्राचार्य डॉ. राजेंद्र रामदास अहिरे**

विद्या विकास मंडळाचे

सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री